अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडल

संदर्भ क्र. : 7612

दिनांक : 16 OCT 2017

## इयत्ता 10 वी बोर्ड परीक्षेस बसलेल्या अ.भा.गां.म.वि.मंडळाच्या परीक्षार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण निवेदन

मार्च 2018 मधे संपन्न होणा-या 10 वी बोर्ड (एस्.एस्.सी) परीक्षेस बसलेल्या आणि नोव्हेंबर / डिसेंबर 2017 सत्रासाठी अ.भा.गां.म.वि.मंडळाची प्रवेशिका पूर्ण किंवा मध्यमा पूर्ण परीक्षा देणा-या महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांसाठी खालील निवेदन प्रकाशित तथा प्रसारित करण्यात येत आहे.

कलेला प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने संगीताच्या तीन व पांच परीक्षा उत्तीर्ण असणा-यांसाठी अनुक्रमे 10 आणि 15 गुण 10 वी बोर्ड परीक्षा देणा-यास (रिपीटर विद्यार्थ्यांना वगळून) मिळतील असे जाहीर केले आहे. सदरील अतिरिक्त गुण योजनेचा लाभ अ.भा.गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या परीक्षार्थ्यांना व्हावा या दृष्टीने मंडळाने नोव्हेंबर / डिसेंबर 2017 च्या क्रियात्मक परीक्षा वेळापत्रकात पुढील बदल विशेष बाब म्हणून केला आहे.या दृष्टीने केवळ अशा (लाभार्थी) परीक्षार्थ्यांची क्रियात्मक परीक्षा दि.25 आणि 26 नोव्हेंबर रोजी पुणे, नागपूर,मिरज आणि वाशी (नवी मुंबई) येथे आयोजित करण्यात आली आहे.

यासाठी महाराष्ट्रातील संबंधीत केंद्र व्यवस्थापकांनी आपल्या केंद्रातून नोव्हेंबर / डिसेंबर 2017 च्या परीक्षांसाठी प्रवेशिका पूर्ण किंवा मध्यमापूर्ण परीक्षा देण्या-या 10 वी बोर्डाच्या (सी.बी.एस.सी.सोडून) मार्च 2018 च्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांची वरील योजनेचा लाभ घेण्यासाठीची संमती चार पैकी एक शहराच्या निवडीसह तसेच 'सदरील विद्यार्थी 10 वी बोर्डाच्या मार्च 2018 च्या परीक्षेस बसला आहे ...' अशा आशयाच्या विद्यार्थ्यांच्या शाळेच्या मुख्याध्यपकांचे पत्रासह मंडळाच्या रजिस्ट्रार कार्यालयास मेलद्वारे त्वरित कळविणे आवश्यक आहे.

तसेच 10 वी बोर्ड मार्च 2018 च्या परीक्षेस बसलेल्या परीक्षार्थ्यांनी अ.भा.गां.म.वि.मंडळाची प्रवेशिका पूर्ण किंवा मध्यमा पूर्ण परीक्षा अगोदरच उत्तीर्ण केली असेल तर या परीक्षा प्रमाणपत्राच्या (सलग तीन किंवा सलग पाच प्रमाणपत्रांच्या) सत्यप्रतींसह मंडळाच्या रजिस्ट्रार कार्यालयास त्वरित संपर्क करावा, म्हणजे त्यांच्या प्रमाणपत्रांची पडताळणी करुन सदरील विद्यार्थ्यांची यादी एस्. एस्. सी. बोर्डाकडे पाठविता येईल.



प्रधान कार्यालय : गांधर्व निकेतन, प्लॉट नं. 5, सेक्टर 9 ए, वाशी, नई मुंबई 400 703. टेली. : 022 - 27 66 20 15
रजिस्ट्रार ऑफिस : गांधर्व निकेतन, ब्राह्मणपुरी, मिरज 416410. टेली/फॅक्स : 0233 - 2 22 2526 / 2527, 2 22 8126 / 8127
Email : mrj_abgm@rediffmail.com

संदर्भ क्र. : 7612

दिनांक : 16 OCT 2017

तर नोव्हेंबर/ डिसेंबर 2017 परीक्षा सत्राद्वारे मंडळाची प्रवेशिका पूर्ण किंवा मध्यमा पूर्ण परीक्षा पूर्ण करु इच्छिणा-या 10 वी बोर्डाच्या परीक्षार्थ्यांना वरील अतिरिक्त गुणांचा लाभ मिळविण्यासाठी, नोव्हेंबर/डिसेंबर 2017 च्या प्रवेशिका पुर्ण किंवा मध्यमा पूर्ण परीक्षेच्या परीक्षा क्रमांकासह (हॉलतिकीटच्या झेरॉक्स सह) दि.25 व 26 नोव्हेंबर 2017 रोजी क्रियात्मक परीक्षा देण्याची संमती (वरील दिलेल्या शहरांपैकी एका शहराची परीक्षा केंद्र म्हणून निवड दर्शवून) मंडळाच्या रजिस्ट्रार कार्यालयास दि.10 नोव्हेंबर 2017 पर्यंत कळवल्यास त्यांची क्रियात्मक परीक्षा घेवून, त्वरित परीक्षा निकाल तयार करुन अशा विद्यार्थ्यांची यादी देखील एस.एस.सी.बोर्डाकडे पाठविण्यात येईल.

तेव्हा संबंधित विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक व केंद्रव्यवस्थापकांनी कालमर्यादेचे भान ठेवून त्वरित कार्यवाही करावी असे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय मंडळातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

**वर दर्शविलेल्या तारखेपर्यंत (दि.10 नोव्हेंबर 2017) गांधर्व मंडळाच्या रजिस्ट्रार कार्यालयाकडे विद्यार्थ्यांची माहिती (हॉल टिकीट व मुख्याध्यपकांचे पत्र इ.) व संमती पत्र प्राप्त न झाल्यास शासनाच्या अतिरिक्त गुणांच्या योजनेपासून वंचित राहाण्याबाबतची सर्वस्वी जबाबदारी संबंधित विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक तथा केंद्रव्यवस्थापकावर असेल याची नोंद घ्यावी.**

सदरील निवेदन महाराष्ट्रातील गांधर्व मंडळाच्या सर्व परीक्षा केंद्रव्यवस्थापकांस मेल व रजिस्टर पोस्ट पत्राद्वारे पाठवण्यात आले आहे. तद्वतच गांधर्व मंडळाच्या वेबसाईटवर, संगीत कला विहार' नोव्हेंबर 2017च्या मासिकात आणि सोशल मीडीयाद्वारे प्रसिध्द तसचे प्रसारित करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी सर्व केंद्रांनी मंडळाच्या अधिकृत वेबसाईटवर वेळोवेळी प्रकाशित होणा-या सूचनांचा पाठपुरावा करावा.

A.B.G.M.V. MANDAL MUMBAI

रजिस्ट्रार,
अ.भा.गां.म.वि.मंडळ



प्रधान कार्यालय : गांधर्व निकेतन, प्लॉट नं. 5, सेक्टर 9 ए, वाशी, नई मुंबई 400 703. टेली. : 022 - 27 66 20 15
रजिस्ट्रार ऑफिस : गांधर्व निकेतन, ब्राह्मणपुरी, मिरज 416410. टेली/फॅक्स : 0233 - 2 22 2526 / 2527, 2 22 8126 / 8127
Email : mrj_abgm@rediffmail.com